**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**कार्यकारी अभियंता/ विदयुत/ प्राधिकरण यांचे कार्यालय, खोली क्र. 212, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे पुर्व, मुंबई-400551**
फोन नं. 022-66405441/5498/5031, इ- मेल आय. डी.- eee1mhada@gmail.com

**दरपत्रक सुचना**

जा.क्र. का.अ./विदयुत/ प्राधि/उप./अभि./कोंमं/कोटेशन/ 1182/20
दि. 13/11/2020

कार्यकारी अभियंता/ विदयुत/ प्राधिकरण, खोली क्र. 212, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे पर्व, मुंबई -51 यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शवलेल्या कामाकरीता दर निश्चित करण्यासाठी नोंदणीकृत व अशा प्रकारचे काम करण्याचा 3 वर्षाचा अनुभव असणा-या, जी.एस.टी. नोंदणीकृत, ठेकेदार/ कंपनीकडुन दर मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रकामध्ये कामाचा मुळ दर (एक वर्षाचा दोष दायित्वचा कालावधीसह) पुढील दोन वर्षाच्या देखभालीचा दर व जी.एस.टी. दर स्वतंत्र नमुद करुन करुन कामाच्या बाबींच्या दराचे (शिक्क्यानिशी) मोहरबंद पाकिट दि. 18/11/2020 ते दि. 24/11/2020 पर्यंत दुपारी 3.00 वाजेपर्यंत उपरोक्त कार्यालयामध्ये पोहचतील असे पाठविण्यात यावे.

**(सदरील दरपत्रक फक्त उपरोक्त कामाचे दर निश्चित करण्यासाठी मागविण्यात येत आहे, तरी कार्यादेशाचा दावा करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.)**

**कामाचे नाव- म्हाडा कॉलनी, सर्वे क्र.376 व सर्वे क्र.392 भाग विरार बोईंज, विरार (प), जि. पालघर येथील इमारत क्र. 14 साठी 50 के. एल. डी. क्षमतेचा M.B.B.R. प्रकारचा मलनिःस्सारण प्रकल्पाच्या मशीनची रचना, पुरवठा, उभारणी, चाचणी करणे, कार्यांन्वित करणे, तसेच सक्षम प्राधिका-यांकडुन सर्व आवश्यक त्या मंजुरी घेणे, ना-हरकत प्रमाणपत्र मिळवणे इ.**

**कामाचे स्वरुप- 50 के. एल. डी. क्षमतेचा M.B.B.R. प्रकारचा मलनिःस्सारण प्रकल्पाची रचना, पुरवठा, उभारणी, चाचणी करणे, कार्यांन्वित करणे, तसेच सक्षम प्राधिका-यांकडुन सर्व आवश्यक त्या मंजुरी घेणे, ना- हरकत प्रमाणपत्र मिळवणे** व एक वर्षाच्या विनामुल्य देखभाल व दुरुस्तीच्या कालावधीनंतर दोन वर्ष विनामुल्य देखभाल व दुरुस्ती करणे. तसेच कॉमन बार स्क्रिन, सिवरेज ट्रान्सफर पंप, अनोक्झीट टॅन्क पंप, एअर ब्लोअर, इलेक्ट्रिक मोटर फॉर ब्लोअर, डिफ्युजर मेमरेन, मिडीया फॉर बायो रियाक्टर, टयुब मिडिया, स्लज पंप, पी. ए. सी. डोसींग सिस्टिम, फिल्टर फिड पंप, ओझनेटर, इंटरकनेक्टिंग पायपिंग व फिटिंग, वॉल्व व फिटिंग, मोटर, इलेक्ट्रिकल पॅनल, केबल्स, इक्विपमेंट अर्थिंग, लेवल स्विच, आवश्यक प्रमाणात साहित्य इ. बसविणे तसेच एक वर्षाच्या दोष व दायित्वाच्या कालावधीनंतर दोन वर्ष विनामुल्य देखभाल व दुरुस्ती करणे.

## अटी व शर्ती

1. ठेकेदाराने/ एजन्सीने/ कंपनीने एक वर्षाचा विनामुल्य देखभाल कालावधी पुर्ण झाल्यानंतर एक वर्ष पुर्णतः मोफत प्रकल्प चालवणे व त्याची देखभाल, दुरुस्ती करण्यासाठी लागणा-या खर्चाच्या रक्कमेचा विचार करावा व सदरचे दर स्वतंत्ररीत्या नमुद करावेत.
2. ठेकेदाराने/ एजन्सीने/ कंपनीने दरपत्रक कामाचे मुळ दर, वार्षिक देखभाल व दुरुस्तीचे दर व जी.एस. टी. चे दर स्वतंत्ररित्या भरावेत.
3. ठेकेदाराने/ एजन्सीने/ कंपनीने दरपत्रक पुर्णपणे भरलेले व कंपनीच्या/ एजन्सीच्या सही व शिक्का, जी. एस. टी. प्रमाणपत्र व फनकार्ड इ. सह मोहरबंद लिफाफ्यामध्ये सादर करावे.
4. एक किंवा सर्व दरपत्रक स्विकारणे, अथवा कारण न देता रद्द करणे/ नाकारणे याबाबत निर्णय घेण्याचे कार्यकारी

अभियंता/ विदयुत/ प्राधिकरण यांना पुर्ण अधिकार राहतील.

5. सदरचे दरपत्रक फक्त उपरोक्त कामाचे दर निश्चित करण्यासाठी मागविण्यात येत आहेत. तरी कार्यादेशाचा दावा करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता/ विदयुत/
प्राधिकरण